# बालसाहित्य : मनोरंजन आणि संस्काराची शिदोरी

**प्रिती सुधाकरराव मोकळकर**
*डि. टि. एड., एम. ए. मराठी (NET), मराठी आचार्य पदवी संशोधन केंद्र - श्री बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा, जि. यवतमाळ, केंद्र क्रमांक - 410*
*pritimokalkar1991@gmail.com*

**प्रा. डॉ. अन्नपूर्णा अजाबराव चौधरी**
*प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, श्री बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय पांढरकवडा, जि. यवतमाळ*

**प्रस्तावना :**

आपल्या भारतामध्ये अनेक जातीचे, अनेक धर्मांचे, अनेक पंथांचे व्यक्ती वास्तव्य करतात. त्या प्रत्येक व्यक्तींची वेगवेगळी वैशिष्ट्ये व वेगवेगळे गुणधर्म आहेत. 'व्यक्ती तेवढ्या प्रवृत्ती.' या समाजात कोणी थोर व्यक्ती, खेळाडू, देवमाणूस, मदतगार, कर्तुत्ववान, दयाळू, प्रेमळ, वीर, समाजसेवक आहेत, तर कोणी भांडखोर, गुन्हेगार, अपराधी, रागीट, हिस्त्र, संशयी, निर्दयी अशा अनेक प्रवृत्तीचे व्यक्ती आपल्याला पाहायला मिळतात. याला कारण काय ? तर त्यांच्यावर होणारे संस्कार, त्यांना मिळणारे मार्गदर्शन, त्यांच्या घरचे वातावरण, त्यांनी अनुभवलेला परिसर कसा आहे हे महत्त्वपूर्ण ठरतं. त्या व्यक्तीवर जसे संस्कार होत गेले असतील तसा तो व्यक्ती घडत असतो. म्हणून उद्याचा उत्तम नागरिक होण्यासाठी व्यक्तीवर त्याच्या बालपणापासून संस्कार होणे महत्त्वपूर्ण असते.

आपण जीवन जगत असताना आपल्या जीवनामध्ये आपल्याला समृद्ध, यशस्वी, सुखमय, आरोग्यदायी जीवन हवं असतं. आपल्या जीवनामध्ये आपल्याला हिरवळ हवी असते, हि हिरवळ पाहिजे असल्यास त्या झाडाचं (रोपटे) संगोपनही उत्तम पद्धतीने करावे लागते. त्या झाडाला लागेल तेव्हा खत, लागेल तेव्हा पाणी ही घालावे लागते. त्या झाडाला उन्हाचे चटके ही सहन करावे लागतात तर वादळ, जास्त पाऊस, कमी पाऊस, प्रदूषण यांच्याशीही संघर्ष करावा लागतो आणि या संघर्षातून उत्तम पद्धतीचे झाड तयार होत असते. म्हणजेच आपल्याला उत्तम नागरिक घडवायचा असेल तर त्याची सुरुवात त्याच्या बालपणापासून व्हायला हवी. उद्याचा उत्तम भारत घडवायचा असेल तर प्रत्येक बालकावर आज संस्कार होण्याची गरज आहे. बालकावर उत्तम संस्कार व येणाऱ्या संकटावर सामना करण्याची ताकद त्याच्यामध्ये निर्माण केल्यास तो उत्तम नागरिक घडतो.

- **शोधनिबंधाची समस्या :**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात जीवन जगत असताना प्रत्येक माणसाच्या आयुष्यात तंत्रज्ञानाने हात घातला आहे. तंत्रज्ञानाने आपण अनेक क्षेत्रात प्रगती केली असली तरी तंत्रज्ञानामुळे होणारे नुकसानही अनेक प्रकारचे आहेत.

आपण लहान होतो तेव्हा अनेक प्रकारचे खेळ खेळायचे जसे की, विटी-दांडू, कांचे, गार, लपंडाव, धाबाधुबी, लगोरी, चौकष्टा, डोंगराला आग लागली. पण दुर्दैव की आजच्या बालकांना या खेळांची नावेही माहिती नाहीत. तंत्रज्ञानाने मनोरंजनाची अनेक साहित्य आणली. मनोरंजनाच्या तंत्रज्ञानामुळे आजच्या बालकाचा घात करून टाकला. आजचा बालक जास्त वेळ मोबाईलला चिकटून असणारा, दूरदर्शन वर कार्टून बघणारा, संगणकावर खेळ खेळणारा आहे. त्यामुळे तो सतत नैराश्यात असणारा, रागीट असणारा, एकांतात राहणारा, वैफल्यग्रस्त जीवन जगणारा असा झाला आहे. अशा अनेक समस्या बालकांच्या बाबतीत तयार झालेल्या आहेत. या समस्यांना बालसाहित्य हा उपाय असू शकतो असं मला वाटते.

- **शोधनिबंधाची उद्दिष्टये :**

१) बाल साहित्यातून बालकांना मिळणाऱ्या प्रेरणांचा अभ्यास करणे.
२) बदलत्या जीवनशैलीनुसार बालसाहित्यातील नवीन संकल्पनांचा अभ्यास करणे.
३) बालसाहित्यातून बालकांच्या जिज्ञासापूर्तीचा अभ्यास करणे.

४) बाल साहित्यातल्या नैतिक शिकवणीने चांगल्या वाईटाची जाण मुलांमध्ये निर्माण करणे.

- **शोधनिबंधाची गृहितके :**

१) बालसाहित्यातील कल्पनारम्य वातावरणाने मुलांचे मनोरंजन होते.

२) बाल साहित्य लेखनातील व्यक्तिरेखा अधिक जोरकस आणि सक्षम करण्यावर भर देते.

३) बाल साहित्य बालकांचे भावविश्व आणि विचारविश्व समृद्ध करणारी गोष्ट आहे.

४) बालसाहित्य बालकांवर संस्कार करणारी शिदोरी आहे.

- **शोधनिबंधाची कार्यपद्धती :**

'बालसाहित्य : मनोरंजन आणि संस्काराची शिदोरी' या विषयावर विचार करताना उपलब्ध संदर्भ ग्रंथांचे, आधारभूत पुस्तकांचे अध्ययन केले जाणार आहे. इंटरनेट वरील विषयासंबंधी माहितीचा वापर करण्यात येणार आहे.

- **शोधनिबंधाच्या विषयाचे विश्लेषण :**

'बालसाहित्य : मनोरंजन आणि संस्काराची शिदोरी' या विषयाचा अभ्यास करीत असताना बालकांसाठी असणारे बालगीत, बालकथा, बालनाट्य, बालकादंबरी, कोडी, बालकविता, चरित्रे इत्यादींचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

- **बालसाहित्य - मनोरंजन आणि संस्काराची शिदोरी :**

आजचा बालक डिजिटल युगात वावरतो आहे. त्याची कल्पनाशक्ती अफाट आहे. त्यांच्या कल्पनाशक्तीला अनेक चांगल्या गोष्टींची जोड देण्याची गरज आहे. नव्वदच्या दशकानंतर एकत्र कुटुंब पद्धती हळूहळू संपुष्टात येऊ लागल्याने नव्या पिढीला आजी आजोबांच्या गोष्टी कोण सांगणार ? तर काळाची नेमकी गरज म्हणून संस्कारक्षम बालसाहित्याला आज महत्त्वपूर्ण स्थान आहे. आजच्या एखाद्या गावच्या मुलांना परिचित असणारा किंवा आजच्या बालकांना अनेक जुन्या गोष्टींची माहिती करून देताना वासुदेवाचा खेळ कसा होता याचा परिचय 'वासुदेव आला'[१] या कवितेतून एकनाथ आव्हाड या बालसाहित्यिकाने करून दिला आहे.

**"हातात चिपळया, गळयात माळा**
**मोरपिसांची टोपी, गाता गळा**
**घोळदार झगा, काखेत झोळी**
**खांद्यावर शेला, टिळा कपाळी"**

वरील दोन कडव्यातून वासुदेवाचे रूप, पोशाख, नाच, गाणं सारं काही नजरेसमोर हुबेहूब उभे राहते. त्यात 'ळ' या अक्षराची पुनरुक्ती वेगळीच गंमत आणते. त्यामुळे मुलांना वासुदेवाची माहिती तर मिळतेच पण त्याचे मनोरंजनही घडून येते.

**"एकदा एक माणूस**
**दारोदारी होता फिरत**
**उपाशीपोटी अन्नासाठी**
**वणवण होता भटकत"**

'माणुसकीचा धर्म'[२] या कवितेतून लहानशी एक कथा समोर येते. ती सहजपणे काही मूल्यसंस्कारही करून जाते. या कवितेत श्रीमंत सावकार आणि गरीब उपाशी माणूस यांची लहानशी कथा आपल्याला दिसून येते. भुकेल्याला जेवू घालण्याचे मोठे मन शेठजीकडं नाही. त्यामुळे पैशाने ते धनवान असले तरी मनाने दरिद्री आहेत, हे तो भुकेला माणूस तिथून निघून जाताना सहज बोलता बोलता सुचित करतो. तेव्हा आपल्या घासातला अर्धा घास भुकेल्याला काढून देणं हाच खरा मानवता धर्म आहे हे जीवनमूल्य लक्षात येतं. त्याचबरोबर सहानुभूती, करुणा, बंधुभाव ही माणूस असण्याची खरी लक्षणे आहेत हे लक्षात येते.

पूर्वीच्या काळी अनेक मोठे वाडे असत. मोठे अंगण, अवतीभोवती झाडेमाडे, त्यावर येणारे पक्षी पाखरे, या सर्व वातावरणात लहान मुले एकीकडे वाढत असत, पक्षी प्राण्यांची ओळख त्यामुळे त्यांना सहज होत असे.

**"इथे इथे बस रे मोरा**
**बाळ खाली चारा**
**चारा खा, पाणी पी,**
**बाळांच्या डोक्यावरून भुर्र उडून जा"**

या गीतामधूनही पक्षांशी मैत्री करायची असते, त्यांना खाऊ पिऊ घालायचे असते, मुक्त स्वतंत्रपणे उडू द्यायचे असते, हा संस्कार बाळाच्या मनावर आईच्या कडेवर बसून होत असतात.

बैलाप्रती आपुलकी दाखविणारा सण म्हणजे बैलपोळा. बैलपोळयाच्या दिवशी बैलांची शिंगे रंगवून, त्यांना झुली पांघरून, घरातल्या मंडळींची, बाळगोपाळांची जेवणे

होण्यापूर्वी बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो. वर्षभर राबणाऱ्या बैलांना त्या दिवशी संपूर्ण विश्रांती.

दिवाळी हा आनंदाचा क्षण. गोठ्यात गायी-म्हशी बांधलेल्या असतात. आपल्या सणाच्या आनंदात त्यांना सामील करून घेणे हा भारतीय परंपरेचा एक फार महत्त्वाचा भाग.

**"दिन दिन दिवाळी**
**गाई म्हशी ओवाळी**
**गाई म्हशी कोणाच्या**
**लक्षुमणाच्या ......**
**लक्षुमण कोणाचा**
**आई बापांचा."** (३)

प्राण्यांवर प्रेम करा, कृतज्ञता बाळगा. प्राणी ही आपली खूप मदत करत असतात हे या गीतातून आपल्याला दिसून येते.

लहान मुलांना जगाबद्दल, आसपास घडणाऱ्या लहानशा घटनेबद्दल सुद्धा अतिशय कुतूहल असते. त्यांच्या लहानशा मेंदूत प्रश्नच प्रश्न असतात. कधी ते सृष्टीच्या घडामोडी बद्दल असतात. पाऊस कसा पडतो ? चांदोबा कधी छोटा, कधी मोठा का होतो ? मुंग्यांची रांग कुठे जाते ? दिवसा दिसणारा सूर्य रात्री कुठे जातो? या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देण्यासाठी कल्पनाशक्तीचाच वापर करावा लागतो.

कधी आजूबाजूच्या परिसरात विविध प्राणी दिसतात. विविध आकारांचे, वेगवेगळे आवाज काढणारे पशुपक्षी मुलांना आकर्षूण घेतात. तुडतुड्या मारत जिकडे तिकडे धावणारी, मध्येच बें-बें करणारी बकरीची पिल्ल, लोकरीच्या गुंडाळयासारखी दिसणारी कुत्र्याची पिल्लं, खिडकीच्या गजावर बसून इकडे तिकडे पाहत चू-चू करणारी, मध्येच एखाद्या धान्यात टोच मारणारी चिमणी, शेपटी फरटकारत माशा उडवणाऱ्या गाई, त्यांचं ते मान उंच करून आपल्याकडून गळयावरून हात फिरवून घेणं, हे सगळं लहान मुलांच्या दृष्टीने अद्भुत असतं. या पशु-पक्षांची प्रत्यक्ष ओळख होतांनाच विविध गाणी त्यांच्या विषयी माहिती देतात. याबरोबर माणसातला व्यापार, देवघेव हेही मुलांना कळून घेणे आवश्यक असते. सध्याच्या डिजिटल वातावरणात टी.व्ही. वरच्या विविध वस्तूंच्या आकर्षक जाहिरातींची रेलचेल, त्यावरची बक्षिसांची खैरात, यामुळे मुलांना वस्तू आणि त्यांची किंमत याविषयी लहान वयातच खूप समज आहे.

लहान मूल आई बरोबर दुकानात जाते. आईने एखादी वस्तू घेतली, पैसे दिले, दुकानदाराने उरलेले पैसे परत दिले. ही सगळी घटना मूल निरखून पाहते. परत कधीतरी आईने एखादी वस्तू घेतली, नेमके पैसे दिल्यामुळे दुकानदाराने पैसे परत केले नाहीत की ते मुल निरागसपणे विचारते, “आई, आपण त्यांना पैसे दिले तरी त्यांनी काहीच पैसे आपल्याला दिले नाहीत.” आई मग पैशांचा, वस्तूंचा परस्पर विनिमय कसा असतो ते मुलाला सोप्या भाषेत समजावून सांगते. कधी-कधी वजाबाकीसारखा प्रकार एखाद्या बालगीतातून त्याला समजावून सांगते,

**"दहा बाई चिमण्या**
**भारी चिव चिव**
**एक गेली उडून**
**राहिल्या नऊ"** (४)

बालकांना व्यवहार करण्याची कला ही या ओळीतून आपल्याला साध्य झालेली दिसते.

ज्ञान आणि मनोरंजनाव्यतिरिक्त बाल साहित्याच्या संदर्भात एक मुद्दा बऱ्याचदा चर्चिला जातो. तो म्हणजे मुलांच्या नैतिक शिकवणुकीचा. या वयातच बाहेरच्या प्रत्येक गोष्टीला प्रतिसाद कसा द्यायचा हा प्रश्न मुलांपुढे उभा राहत असतो. त्यांच्या दृष्टीने काही आवडत्या गोष्टी असतात, तर काही गोष्टी नावडत्या असतात. उदाहरणार्थ, ‘दात घासणे’ ही बहुसंख्य मुलांची नावडती गोष्ट असते. तरी दात घासणे शिकवावेच लागते. तसेच वर्तणुकीचे नियम, समाज व्यवहारातील आचार त्याला समजावून सांगावे लागतात. अशा वेळेस बाल साहित्य खूप उपयोगी पडते. नुसत्या कोरड्या उपदेशापेक्षा एखादी गोष्ट करायची, याविषयी एखाद्या कथेतून वाचायला मिळालं तर मुलांनाही ती गोष्ट करावीशी वाटते. उदा. एखाद्या संजूच्या तोंडातून पोटात शिरून संपूर्ण शरीराच्या स्वच्छतेची मजेदार माहिती देणारा एखादा स्वप्नातला प्राणी मुलांना दात घासण्याबद्दल जागरूक करू शकतो.

बालकांना कष्टाची जाणीव करून देतांना राब राब राबणारा वडिल. स्वतःच्या चप्पलला भोकं पडली असली तरी पोरांना शाळेचा पोशाख घेऊन देणारे वडील, त्यांना काटा रुतू नये म्हणून घेऊन दिलेली चप्पल, यातून वडिलांनी आपल्यासाठी घेतलेले कष्ट याची जाणीव बालकांना होत असते.

दोन ससे आणि एका बोकडाची गोष्ट आहे. एक करडा ससा होता आणि एक पांढरा. पांढरा ससा आळशी होता आणि करडा ससा कष्टाळू होता. बोकड दादाचं कोबीचे शेत होतं. पांढरा ससा त्याच्याकडे कोबी मागण्यासाठी गेला. बोकडदादाने बास्केट भर कोबी त्याला दिली. करडा ससा ही तेथे आला. बोकडदादा ने त्यालाही कोबी देऊ केले पण त्याने घेतले नाही. त्याऐवजी कोबीच्या बिया त्याने घेतल्या. स्वतः पिकवले. इथे शेतातील सर्व प्रक्रिया येतात. स्वतः पिकवलेल्या कोबी घेऊन तो बोकडोबाला भेटायला गेला. तिथे पुन्हा कोबी मागायला पांढरा ससा करड्या सशाने पिकवलेल्या कोबी पाहून ओशाळून गेला. मग त्याने स्वतः ही कोबी न मागता कोबीचे बी मागितले. यावरून बालकांना हे लक्षात येईल की कोणतीही गोष्ट कष्ट, मेहनत करून आपण उत्तम पद्धतीने मिळवू शकतो.

'फुलपाखराची गोष्ट'(५) ही एक अतिशय कल्पक गोष्ट आहे. या गोष्टीची नायिका आहे 'चिमी' नावाचं एक फुलपाखरू, निळसर रंगाचं, नाजूक फुलपाखरू. एकट्यानं राहायला, भटकायला चिमीला आवडतं. बांबूच्या बनाकाठी गेली असताना त्याला दिसते एक मुलगी, मुसमुसून रडणारी, शमा नावाची. शमाचा लालसर पतंग उंच चिंचेच्या झाडावर अडकल्यामुळे ती रडत असते. चिमी तिला मदत करायची ठरवते. मदतीसाठी ती गोगलगाईला, खारुताईला सहाय्य मागते. दोघी तिला मदत करतात पण काही केल्या पतंग निघत नाही. शेवटी तिला पाच भाई फुलपाखरं दिसतात. पाच भाई म्हणजे पाच फुलपाखरं. दाट जंगलात राहणारी, उंच शेंड्यावरून फिरणारी, ताकदवान आणि एकीनं राहणारी. चिमी त्यांच्याकडे मदत मागते आणि ते पतंग काढून देतात. पाच भाईंच्या एकत्र येण्याने पतंग सुटतो. शमाला आनंद होतो. चिमीला आनंद होतो. सोबतच एका गोष्टीचा साक्षात्कारही चिमीला होतो. 'एकजूट करून जर आपण राहिलो, तर कोणतीही गोष्ट मिळविता येते, आपलीशी करता येते.' मी सुद्धा आजपासून एकटी नाही राहणार. माझ्या मित्रांसोबत जाणार, असा चिमी निश्चय करते. या कथेतून बालकांना एकजुटीने राहण्याचे महत्त्व लक्षात येते.

पकडलेल्या उंदराला त्याच्या विनंतीवरून सोडून देणारा सिंह आणि तोच सिंह जाळयात अडकल्यावर ती जाळे आपल्या चिमुकल्या दातांनी तोडून सिंहाला वाचवणारा, उपकाराची फेड करणारा उंदीर पाहिल्यावर या भावनिक संबंधाचा एक विलक्षण ठसा त्यांच्या मनावर उमटतो. एवढा मोठा क्रूर सिंह आणि एवढासा लहानसा उंदीर यांची परस्परांशी अशी वागणूक ही असू शकते, हा त्यांच्या गृहीत प्रतिमांना छेद देणारा विचार त्यांना वेगळ्या कल्पना विश्वास घेऊन जातो. त्यांच्या कल्पनाशक्तीच्या कक्षा विस्तारतात. (६)

कल्पनाशक्ती बरोबरच साहित्य त्यांच्या अनुभव विश्वाचाही विस्तार घडून आणते. आपल्या कुटुंबातल्या, अवतीभवतीच्या व्यक्ती, त्यांच्याद्वारे त्यांना येणारे अनुभव तसे खूपच मर्यादित असतात. या वयात त्यांचे अनुभव विश्व किती तोकडे असते. त्यांच्या अवतीभोवतीचे जग लहानसे, छोटेसे असते. पण बाल साहित्य त्यांना वेगळ्या वातावरणात घेऊन जाते. वेगळ्या माणसांशी, व्यक्तींशी त्यांची ओळख करून देते. वेगवेगळ्या स्थळांचे दर्शन घडवते. त्यांना दिसणारा नेहमीचा डोंगर, नदी, झाडे, पशु, पक्षी यांच्या वेगळ्या व्यक्तीचित्रणातून त्यांना त्यांचे वेगळे स्वरूप समजते. नवनवीन अनुभव त्यांच्या मनपटलावर रेखाटले जातात.

माणसाच्या वर्तणूकशीही साहित्य मुलांचे नाते जोडते. कारण एखाद्या कथेत, कादंबरीत त्यांच्या अनुभवातल्या भावभावनांच्या अविष्कारापेक्षा अगदीच वेगळी माणसे कधीकधी रंगवलेली असतात. जगात फक्त आपले आई, बाबा, ताई, दादा यांच्यासारखेच माणसे नसतात; तर वेगळीही असतात. त्यांच नात्यात ती वेगळी विचित्र वागू शकतात. कधी आपल्या अनुभवापेक्षा चांगली, कधी त्यापेक्षा वाईटही असू शकतात असे वाचल्यानंतर ठराविक नात्यांचे, माणसांचे ठराविक वर्तणुकीचे शिक्के त्यांच्या मनातून पुसले जातात. मग अशी ही माणसे जगात असू शकतात, आपल्याला ती भेटली तर आपण कसे वागायला हवे, आपल्या मित्र-मैत्रिणींच्या बाबतीत चांगल्या आणि वाईट माणसांच्या दृष्टीने आपली भूमिका कोणती, आपले कर्तव्य काय याचा बालक विचार करू लागतात. मग ही माणसं सत्यातली असेल, कथेतील असेल, इतिहासातली असली तरी माणसांच्या आयुष्यातले प्रसंग, त्यांची परस्पर नाती आणि त्यांच्या वर्तणुकीची चित्रे यातून मुलांचे अनुभवविश्व समृद्ध होत असते.

**निष्कर्ष :**

बालसाहित्य हे मुलांच्या जीवनातील एक अविभाज्य अंग आहे. ते त्यांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि भावनिक विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे मुलांना चांगले बालसाहित्य वाचायला मिळणे खूप महत्वाचे आहे.

**संदर्भ सूची :**


1) आव्हाड एकनाथ – 'मैत्री आमची भारी', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती – 15 डिसेंबर 2024, पृ. क्र. 24.
2) तत्रैव – पृ. क्र. 40.
3) भागवत लीलावती – 'मराठी बालसाहित्य : प्रवाह आणि स्वरूप', नविन उद्योग प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती – 1995, पृ. क्र. 46.
4) महाजन सुजाता – 'बालसाहित्य : स्वरूप आणि वाटचाल', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम प्रकाशन-जून 2002., पृ.क्र. 3.
5) सुर्वे बोरसे विद्या – 'बालसाहित्य : आकलन आणि समीक्षा', स्पर्श प्रकाशन, राजापूर, प्रथमावृत्ती – 22 ऑक्टोबर 2015.
6) भागवत लीलावती – 'मराठी बालसाहित्य : प्रवाह आणि स्वरूप', नवीन उद्योग प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती – 1995, पृ. क्र. 40.